# सुवर्ण महोत्सवी आदिवासी पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना

**प्रस्तावना : —**

राज्यातील अनुदानित /विना अनुदानित,माध्यमिक शाळा ,जिल्हा परिषदांच्या शाळा,नगरपालिका व महानगरपालिकांच्या शाळांमध्ये ईयत्ता १ ली ते १० वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना दिनांक ३१/०५/२०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात आली आहे. शिष्यवृत्ती योजने गैरव्यवहार होऊ नयेत तसेच पात्र लाभार्थ्यास जलद गतीने लाभ प्रदान करण्याच्या अनुषंगाने ऑफलाईन अर्ज करणे व पडताळणी करुन अंतिम लाभ विद्यार्थी /पालक यांच्या बँक खात्यात मंजूर करण्याच्या दृष्टीने सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून सदर योजनेची अमलबजावणी ई-विकास या ऑनलाईन प्रणालीद्वारे सुरु करण्यात आली आहे.

पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज मुख्याध्यापक /शाळा स्तरावर भरण्यात येत असल्याने त्याबाबत विद्यार्थी यादी ,त्यांचे बँक खाते इत्यादी तपशील संबंधित शाळांचे मुख्याध्यापक स्तरावर उपलब्ध असते आणि त्यांच्या मार्फत विद्यार्थ्यांचे अर्ज गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केले जातात व तदनंतर आदिवासी विकास विभागाचा क्षेत्रिय अधिकारी म्हणून प्रकल्प अधिकारी यांच्या मान्यतेने शिष्यवृत्ती वितरीत केली जाते.

**सदर योजनेअंतर्गत देण्यात येणा-या शिष्यवृत्ती दर खालीलप्रमाणे राहतील.**

| अनु.क्र. | इयत्ता | शिष्यवृत्ती रक्कम |
|---|---|---|
| १. | **इयत्ता १ ते ४ थी** | १,०००/- |
| २. | **इयत्ता ५ वी ते ७ वी** | १,५००/- |
| ३. | **इयत्ता ८ वी ते १० वी** | २,०००/- |

**अटी व शर्ती :-**

१) अनुदानीत/विना अनुदानीत प्राथमिक,माध्यमिक शाळा, जिल्हा परिषदांच्या शाळा, नगरपालिका व महानगरपालिकांच्या शाळांमध्ये इयत्ता १ ली ते १० वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या पात्र विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल.

२) अनुसूचित जमातीच्या **विद्यार्थ्यांची उपस्थिती प्रतीमाह ८०% असणे आवश्यक राहील.**

३) शासकीय व अनुदानीत **आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.**

४) नामांकित शाळांमध्ये, सैनिकी शाळांमध्ये,इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या ज्यामध्ये शासनाकडून त्यांच्या शिक्षणाचा खर्च अदा करण्यात येतो. अशा अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्तीचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

**५) ज्या विद्यार्थ्यांचे पालक शासकीय, निमशासकीय (केंद्र व राज्य शासन ) व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ( केंद्र व राज्याच्या ) तसेच शासन अनुदानीत संस्थामध्ये सेवा करत आहेत. तसेच ज्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.१,०८,०००/- ( अक्षरी रु. एक लाख आठ हजार फक्त) किंवा त्यापेक्षा जास्त आहे, अशा विद्यार्थ्यांना उपरोक्त शिष्यवृत्ती अनुज्ञेय राहणार नाही.**

**६)नापास झालेल्या विद्यार्थ्यांना त्याच इयत्तेमध्ये दुसऱ्यांदा सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.** परंतु सदर नापास विद्यार्थी पास होऊन त्यांनी वरच्या इयत्तेस प्रवेश मिळविल्यास त्यांना त्या इयत्तेमध्ये सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील.

**७)मा.सुप्रिम कोर्ट यांनी दिनांक १८/१२/२०२० याचिका क्र.Civil Appeal No. ४०९६ of २०२०, ४०९८-४१०० of २०२०,४०९७ of २०२० and ४१०१ of २०२० चे अनुषंगाने दिलेल्या आदेशानुसार गोवारी जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देता येणार नाही.**

**८) इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकणाऱ्या ज्यामध्ये शासनाकडून त्यांच्या शिक्षणाचा खर्च अदा करण्यात येत नाही अशा इ. 1 ली ते 10 वी च्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देता येईल,करिता त्यांचे अर्ज सादर करण्यात यावे.**

**लाभाचे स्वरुप :-**

१) या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थी व त्याचे आई/वडील यांनी विहित नमुन्यात अर्ज (परिशिष्ट-अ प्रमाणे) करुन तो शाळेच्या मुख्याध्यापकाकडे द्यावा. आई/वडील हयात नसल्यास विद्यार्थ्यांच्या पालकांनी अर्ज सादर करावेत. सदर योजनेखाली शाळेमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र भरुन घेण्याची संपुर्ण जबाबदारी संबधित शाळा/संस्थेची राहील.

२) संबधित मुख्याध्यापकांनी अर्ज भरुन घेऊन अर्जाची छाननी करुन सोबत जोडलेल्या **प्रपत्र-अ** मध्ये संबधित शाळेचे मुख्याध्यापक यांनी माहिती भरुन सर्व अर्ज संबधित पंचायत समिती/शहर साधन केंद्र तसेच महानगरपालिका हद्दीतील शाळा यांनी संबधित महानगरपालिकेच्या प्रशासन अधिकाऱ्यांकडे सादर करावेत.

३) संबधित गट शिक्षणाधिकारी/महानगरपालिकेचे प्रशासन अधिकारी यांनी त्यांच्या अंतर्गत असलेल्या सर्व शाळांचा प्राप्त अर्ज वस्तुनिष्ठ तपासून एकत्रित गोषवारा सोबतच्या प्रपत्र-अ,ब व क नुसार शिक्षणाधिकारी प्राथमिक, जिल्हा परिषद, नागपूर यांच्याकडे सादर करतील. तसेच युआरसी २ च्या अंतर्गत येणारे अर्जाची संकलित माहिती उपशिक्षणाधिकारी माध्यमिक (शहर विभाग)करतील.व युआरसी १ च्या अंतर्गत येणारे अर्जाची संकलित माहिती युआरसी १ उपशिक्षणाधिकारी प्राथमिक (शहर विभाग) करतील.तसेच प्राप्त झालेल्या प्रस्तावाची तपासणी वस्तुनिष्ठ करतील.

४) १० वर्ष वयापर्यंतच्या विद्यार्थ्यांचे संयुक्त बँक खाते हे संबधित विद्यार्थी त्याचे आई/वडील/कायदेशीर पालक यांच्या नावाने झिरो बॅलन्स खात उघडावे. १० वर्षावरील विद्यार्थ्यांचे स्वत:चे बँक खाते उघडावे. सदरची सर्व बँक खाती आधार क्रमांकाशी संलग्न करण्यात यावीत.

५) संबधित मुख्याध्यापक यांनी विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक खात्यात किंवा पालकांच्या संयुक्त आधार संलग्न बँक खात्यात बँकनिहाय यादी करुन RTGS व्दारे शिष्यवृत्ती जमा करावी.

Ratolkar

(रवींद्र शं.काटोलकर)
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद,नागपूर